# प्रतिज्ञापत्र

**'अश्विनी धोंगडे ह्यांचे काव्यलेखन'** या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा हिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक: २९।०६।२००७

**(कु. पद्मा श्यामराव पाटील)**

संशोधक

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. पद्मा श्यामराव पाटील ह्यांनी **'अश्विनी धोंगडे ह्यांचे काव्यलेखन'** ह्या विषयावरील संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या केले असून ते समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे. ही प्रबंधिका ह्यापूर्वी कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : पुणे
दिनांक: २८/०६/२००७

**(डॉ. अविनाश सांगोलेकर)**
संशोधन मार्गदर्शक

# मनोगत

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी 'अश्विनी धोंगडे ह्यांचे काव्यलेखन' ही प्रबंधिका सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे.

मराठी कवितेचे दालन समृद्ध करण्यात प्रारंभीपासूनच कवयित्रींनी फार मोठा वाटा उचललेला आहे. विशेषत: १९६० नंतर नव्यानेच कवितेच्या क्षेत्रात प्रवेश करून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कवितेचा ठसा एकूण मराठी कवितेवर उमटवणाऱ्या अनेक कवयित्री आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अश्विनी धोंगडे ह्या एक महत्त्वाच्या कवयित्री होत. त्यांच्या काव्याविषयी असा अभ्यास झालेला नसल्यामुळे तो आपण करावा, असे मी मनोमन ठरविले. माझ्या आवडत्या विषयावर हा अभ्यास करावयास मिळाल्यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला आहे.

साहित्यविश्वात चाललेल्या घडामोडींविषयी जागरूक असलेले, मराठी गझलेचा सखोल अभ्यास केलेले डॉ. अविनाश सांगोलेकर मला मार्गदर्शक म्हणून लाभले. माझ्या अनेक अडचणी, शंका, तसेच अभ्यास व लेखन कसे करावे, ह्याविषयी मार्गदर्शन केले. त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करेन.

हा अभ्यास करण्यासाठी समीक्षणात्मक संदर्भग्रंथ, नियतकालिके, दिवाळी

अंक, स्त्रीवादी विशेषांक, वृत्तपत्रे इत्यादी साहित्य उपलब्ध होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, पुणे येथील एस्. एन्. डी.टी. महिला विद्यापीठाचे ग्रंथालय, कोल्हापूर येथील करवीर नगर वाचन मंदिर, मी ज्या महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून काम करते, त्या श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथालय ह्यांची मोलाची मदत झाली.

आमच्या संस्थेचे अध्यक्ष रौप्यमहोत्सवी नगराध्यक्ष श्रीमंत विजयसिंह यादव साहेब, उपाध्यक्षा सौ. विजयादेवी यादव वहिनीसाहेब, मानद सचिव अजयदादा थोरात, अभिजितदादा गायकवाड ह्या सर्वांनी मला प्रोत्साहन दिले. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम्. वाय. चोळेकर-बाचूळकर ह्यांच्याकडून मला संशोधनाची प्रेरणा मिळाली. आमच्या महाविद्यालयातील सहकारी अधिव्याख्याते, तसेच प्रशासकीय कर्मचारी ह्यांनी वेळोवेळी माझ्या अभ्यासाची आपुलकीने विचारपूस केली. ह्याशिवाय शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. कृष्णा किरवले व त्यांचे अन्य सहकारी, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. विश्वनाथ शिंदे तसेच डॉ. लता मोरे, प्रा. प्रशांत गायकवाड, प्रा. कु. सहदेव वर्षा, प्रा.एन.एस. मनेर ह्या सर्वांचे मला बहुमोल मार्गदर्शन मिळाले. ह्या सर्वांची मी ऋणी आहे. ज्यांनी माझ्या शिक्षणाचा पाया मजबूत केला, स्वत: फारसे शिकले नसले, तरी आपल्या मुलांनी शिकले पाहिजे, अशी जिद्द बाळगली, आम्हाला स्वावलंबी बनण्याची सोचतत्याने प्रेरणा दिली; ते माझे वडील ती.

दादा; जी शाळेची पायरीही चढली नाही, जिला अक्षरांची, अंकाची ओळखही नाही, ती माझी आई; बंधू विष्णू पाटील, वहिनी सौ. स्वाती , बहीण सुजाता, भावोजी संजय पाटील, माझ्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न करणारे माझे वडीलबंधू उत्तम पाटील ह्या सर्वांचा मला कधीच विसर पडणार नाही.

ह्या प्रबंधिकेचे टंकलेखन श्रीकांत कॉम्प्युटर्स, कोल्हापूर ह्यांनी केले. टंकलेखन करणे हा जरी त्यांचा व्यवसाय असला; तरी माझे काम ज्या आपुलकीने, प्रेमाने व काळजीपूर्वक पद्धतीने केले; त्याबद्दल मला त्यांचे आभार मानावेसे वाटतात.

एकूणच, पदवीसाठीचा हा सर्व संशोधनाचा काळ खूप काही वाचल्यानंतर चिंतनमनन करण्यात, त्यातून लक्षात आलेल्या बाबींवर इतरांशी विचारविनिमय करण्यात खूपच आनंदात गेला.

स्थळ :
दिनांक:

**(कु. पद्मा श्यामराव पाटील)**
अधिव्याख्याता,
श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय,
पेठवडगांव - ४१६ ११२. जि. कोल्हापूर.